CCI NG 3.7 Product: ETMumbaiBS PubDate: 01-11-2025 Zone: MumbaiCity Edition: 1 Page: ETMCSP9 User: sandesh.pingale Time: 11-01-2025 00:04 Color:

Fiscal Deficit Hits 36.5% in H1 on Capex Push

FIGURE WATCH Capex rises 40%; total spending up 9.1% to ₹23.03 lakh crore as govt keeps revenue spending in check

Our Bureau

New Delhi: The Centre's fiscal deficit in the first half of 2025-26 hit 36.5% of the annual target, compared with 29.4% a year before, thanks to higher capital spending and lower net tax collection, showed the official data released on Friday.

In absolute terms, the fiscal deficit between April and September hit ₹5.73 lakh crore, against ₹4.75 lakh crore a year before, the data showed.

However, in September alone, the centre witnessed a fiscal surplus of ₹25,630 crore, against a deficit of ₹89,344 crore a year earlier. This led to an improvement in fiscal deficit, which had hit 38.1% of the full-year target until August.

Last month, economic affairs secretary Anuradha Thakur had exuded confidence that the Centre would meet its target of containing its 2025-26 fiscal deficit at 4.4% of gross domestic product.

The latest data showed capital expenditure surged 40% in the first half of this fiscal from a year before to ₹5.80 lakh crore, thanks to sustained push for infrastructure creation, a spike in disbursement of loans and advances, and a favourable base.

The government, however, kept a lid on revenue spending—which grew just 1.5% to ₹17.23 lakh crore— to maintain fiscal balance in times of a contraction in net tax mop-up. Total spending, consequently, rose 9.1% to ₹23.03 lakh crore.

Net tax revenue contracted 2.8% in the first half of this fiscal from a year before to ₹12.29 lakh crore. However, the contraction in net tax revenue narrowed from 7.3% until August, thanks to a 7.1% rise in mop-up in September alone.

Sluggish tax growth, 16% rise in state devolution drag net revenue

The drop in net tax revenue in the first half was driven by a subdued 2.8% rise in gross tax revenues and a sharp 16% increase in resource devolution to states. "With an asking growth rate of over 21% in H2 FY2026 to meet the FY26 budget estimate, we are apprehensive that taxes will undershoot the budgeted target," said ICRA chief economist Aditi Nayar.

However, Nayar doesn't foresee a "material slippage" in the fiscal deficit relative to the target of 4.4% of GDP, expecting the typical trend of expenditure savings and higher-than-budgeted non-tax revenues to absorb any shortfall in tax revenues. The data showed non-tax revenue jumped 30.5% to ₹4.66 lakh crore in the wake of a record ₹2.69 lakh crore dividend transfer by the central bank. Total receipts increased 8.7% year-on-year until September to ₹17.3 lakh crore.

Subdued retail and wholesale inflation are impacting the pace of growth in the tax collection and has complicated the fiscal arithmetic, said India Ratings associate director Paras Jasrai. "Everything hinges on how the GST rate rationalisation impacts consumption demand in the economy. The early signs of which (through a strong festive season for durables) are encouraging," he added.

In September alone, while capital spending rose almost 31% in September to ₹1.40 lakh crore, revenue expenditure dropped 20.8% to ₹2.73 lakh crore. Overall receipts rose 6.6% in September to ₹4.48 lakh crore.

Money Matters

(Figures, as % of annual target)

	H1FY25	H1FY26
Fiscal deficit	29.4	36.5
Total spending	43.8	45.5
Capex	37.3	51.8
Revenue spending	45.7	43.7
Net tax revenue	49	43.3
Non-tax revenue	65.5	79.9
Total receipts (non-debt)	51	49.5

Source: CGA

CII Budget Wishlist Tax Reforms Must Seek to Simplify, Stabilise & Digitise

Our Bureau

New Delhi: India needs to move towards a principle-based, technology enabled and trust-anchored tax system, which is simple, stable and digitised, aligning with its ambition of becoming a developed economy by 2047, Confederation of Indian Industry (CII) said.

The industry body has submitted its set of tax reform suggestions for the next union budget for 2026-27, covering both direct and indirect taxes, were submitted to the revenue secretary Arvind Shrivastava.

It has called for time-bound dispute resolution, rationalised tax deduction at sources (TDS) regime, and digital customs transformation. "Tax simplification is not a concession; it is an investment in governance efficiency and when rules are clear and systems are digital, compliance becomes automatic and disputes become exceptional," CII director general Chandrajit Banerjee said.

CII expressed deep appreciation for the strong reform momentum created by the government in recent years, which has led to a more predictable, technology-enabled, and growth-oriented tax environment.

"The next stage of reforms must ensure that taxation not only raises revenue efficiently but also acts as a catalyst for investment, innovation and competitiveness," Banerjee said. "The budget can be a pivot for a truly modern, transparent and globally benchmarked tax regime." He cited the example of GST 2.0 reforms, saying the buoyancy in revenues and the credibility of the fiscal-consolidation path have demonstrated that "prudence and progress can move together."

Talking of specific demands, CII said India's tax administration must now shift from being dispute-driven to being dispute-preventive, with over 500,000 appeals pending before commissioners, involving almost ₹ 18 lakh crore of disputed demand.

CII recommended that all high-demand cases above ₹100 crore be fast-tracked for resolution within one year through multiple virtual hearings and close CBDT monitoring.

"Parallel penalty proceedings should remain suspended until the main appeal is resolved, and draft orders should be shared for factual verification before finalisation," the chamber said. It also sought the revival of the Authority for Advance Rulings as an independent, quasi-judicial body headed by retired High Court judges, empowered to deliver binding rulings within six months and open to joint applications from industry associations for sector-wide clarity.

Modernisation of customs, longer validity for advance rulings, and complete digitalisation of clearance systems were among its major indirect tax proposals.

CII also proposed a phased roadmap toward paper-free customs by 2028. "If we now make our tax systems as simple and predictable as they are digital and fair, we will not only raise revenues more efficiently but also build the foundations of an economy that inspires confidence—both at home and abroad," Banerjee said.

Tax simplification is not a concession; it is an investment in governance efficiency and when rules are clear and systems are digital, compliance becomes automatic and disputes become exceptional

CHANDRAJIT BANERJEE
Director General, CII

Import Curbs on Stainless Steel Relaxed Till Dec 31

New Delhi: The government has relaxed import restrictions on stainless steel, allowing the sale of certain products made from BIS non-compliant steel till December 31. This relaxation has been extended due to inadequate domestic production of these grades.

The ministry has reasoned that stainless steel importers have made advance payments against their future orders, and the input material adherence order will disrupt their production.

But domestic stainless steel manufacturers have in a recent interaction with the steel ministry expressed concern about the exemption since imports eat into their market share and also impact their ability to recoup capital investments. "The government should have a consistent policy. If they keep granting exemptions, we won't be able to recover our investments as substandard steel will keep flowing into the Indian market," said a person who attended the steel ministry interaction. The domestic industry has also flagged to the ministry the continuing impact of these exemptions beyond their expiry date. "Even though the order expires on December 31, enough steel would be imported till then to last till June," added a person aware of the development. Further, the exemption order allows steel mills outside India to continue using non-BIS compliant input raw material to make products which will be exported to India, while "we will have to continue adhering to BIS", added the person.

The Indian Stainless Steel Development Association (ISSDA) has backed extending quality control orders to curb Chinese dumping and substandard steel imports. "Imports should be permitted only when the required products are unavailable within the country," ISSDA president Rajamani Krishnamurti said. —Our Bureau

Titagarh Rail Bags ₹2,481 cr Mumbai Metro Contract

New Delhi: Titagarh Rail Systems Limited (TRSL) has bagged a ₹2,481 crore contract for the design, manufacture, and supply of 132 Metro coaches, along with signalling for 24.9 km and telecom systems across 16 stations of the Mumbai Metro Line 5. An official statement said the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has awarded this tender. The contract covers both Phase 1 (Kapur Bawdi-Kasheli-Dhamankar Naka) and Phase 2 (Dhamankar Naka-Bhiwandi-Kalyan APMC) of the Mumbai Metro Line 5 project. This is Titagarh's second major contract for the Mumbai Metro. —Our Bureau

Industry Pushes for Long-term Maritime Infra Financing Options

Ship owners flag credit hurdles; port developers seek 30-50 year loans

Twesh Mishra

New Delhi: Domestic avenues for long-term financing of ports and shipping assets need to evolve for the sector to grow in the country, according to industry representatives.

Speaking at the sidelines of the India Maritime Week 2025, ship owners raised concerns about the reluctance of bankers to lend for their purchases while port infrastructure developers called for 30-50 year debt instruments for appropriately financing requirements.

"There are no viable long-term financing options readily available for port infrastructure development," the finance head of a large private port terminal operator told ET on condition of anonymity.

"Even infrastructure bonds tend to mature in 15-years," the official said, adding that bank loans at high interest rates are the only avenue in most cases. Maritime India Vision 2030 envisages ₹3-3.5 lakh crore of investments across ports, shipping, and inland waterways.

To address the industry's concerns, the Centre has launched a ₹25,000-crore Maritime Development Fund (MDF), besides incentives for shipbuilding and shipyard development.

"National Bank for Financing Infrastructure and Development (NaBFID) is likely to be roped in for operationalising the MDF," a senior government official said, adding guidelines are likely to be issued in the coming months.

NaBFID was set up in April 2021 as a development finance institution (DFI). It is tasked with supporting development of long-term infrastructure financing and related markets in the country. Besides MDF, more government-backed financing institutions have been lending for port infrastructure development. Sagarmala Finance Corporation (SMFC) and Housing and Urban Development Corporation (Hudco) have signed an agreement to finance ₹80,000 crore over the next decade to eligible public and private projects under the Sagarmala programme. This aims to enhance port-led development, reduce logistics costs, and boost India's maritime competitiveness.

Hudco, a Navratna, has also signed four memoranda of understanding (MoUs) with major port authorities to finance projects in India's port infrastructure sector.

Textiles, Gems and Marine Exports to Non-US Mkts Up

PTI

New Delhi: India's exports of textiles, gems and jewellery and marine products recorded healthy growth in several non-US markets during January-September 2025, reflecting a broad-based diversification in the country's outbound shipments, according to the commerce ministry data. Exports from these sectors to destinations such as the UAE, Vietnam, Belgium, and Saudi Arabia recorded sharp increases, driven by rising demand across Asia, Europe, and West Asia. The data showed that India's marine exports during January-September rose 15.6% year-on-year to $4.83 billion, driven primarily by surging demand in several non-US destinations.

While the US continues to remain the top individual destination ($1.44 billion), the sharpest expansions have been recorded in Vietnam (100.4%), Belgium (73%), and Thailand (54.4%), reflecting a growing diversification of India's seafood trade footprint within Asia and Europe.

'GST Returns Due for 3 years Time-barred from November'

New Delhi: Businesses will not be able to file GST returns which are due for three years or more beginning November tax period, GST Network (GSTN) said.

In an advisory, GSTN said monthly, quarterly and annual returns for all GST-registered businesses will be barred from filing after the expiry of three years from the due date. "The said restriction will be implemented on the GST portal from November 2025 tax period, which means any return whose due date was three years back or more and hasn't been filed till November tax period will be barred from filing," it said.

The government had, in 2023, amended GST law providing for time baring of return filing. With effect from December 1, 2025, monthly GST return form GSTR-1 and GSTR-3B due on October 2022, and annual GST return GSTR-9 for 2020-21 fiscal will become time-barred, the GSTN advisory said. —PTI

कारखान्याला आग; पाच जखमी

म. टा. वृत्तसेवा, पालघर

बोईसर एमआयडीसीच्या पूर्वेकडील बेटेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कार्पेट निर्मिती कारखान्यात शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत पाच कामगार जखमी झाले. जखमींना विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले असून चौघांची प्रकृती गंभीर आहे.

येथील 'रिस्पॉन्सिव्ह' या कारखान्याला शुक्रवारी सायंकाळी अचानक आग लागली. आग झपाट्याने पसरल्याने पाच कामगार जखमी झाले. अक्षय कुमार (२३), विजय (२२), रणजीत कुमार (२८), मुकेश चव्हाण (५०), लाला मोहन (४५) अशी जखमींची नावे आहेत. जखमींना प्रथम बोईसर येथील खासगी रुग्णालयांत दाखल करण्यात आले. मात्र तीन कामगारांना नवी मुंबई येथील नॅशनल बर्न सेंटरमध्ये हलवण्यात आले, तर एकाला बोईसर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. किरकोळ जखमी झालेल्या एका कामगाराला सोडण्यात आले. आगविझविण्याचे शर्थीने प्रयत्न संध्याकाळी सात वाजल्यानंतरही सुरू होते.

पाडकामाला गती

एल्फिन्स्टन पुलाच्या रुळांवरील भागावर सोमवारपासून हातोडा

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

- ७८ ब्लॉक घेण्याचे रेल्वेचे नियोजन
- आठशे टन क्षमतेच्या क्रेनचा होणार वापर
- जानेवारी २०२६ अखेर पाडकाम पूर्ण करण्याचे नियोजन
- जानेवारी २०२७पर्यंत पूल उभारणार



पश्चिम रेल्वेवरील एल्फिन्स्टन उड्डाणपुलाच्या रेल्वे रुळांवरील भागावर सोमवारपासून हातोडा पडणार आहे. हा ब्रिटिशकालीन पूल वाहतुकीसाठी याआधीच बंद करण्यात आला आहे. आता, पाडकामात रेल्वेगाड्यांच्या सोळव्या टाळण्यासाठी ७८ रेल्वे ब्लॉक घेण्याचे नियोजन सुरू असून या ब्लॉकमध्ये रुळांवरील पुलाचा भाग शिस्तबद्ध पद्धतीने हटवण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) देखरेखीखाली महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून (महारेल) पुलाचे पाडकाम करण्यात येणार आहे. पाडकाम झाल्यावर या जागी डबलडेकर पुलाची उभारणी करण्यात येणार आहे.

ब्रिटिशकालीन पुलाचे पाडकाम याआधीच सुरू झाले आहे. रेल्वे रुळांवरील भाग पाडण्यापूर्वीचे काम सध्या सुरू आहे. आठशे टन वजनी क्षमतेची क्रेन पाडकामस्थळी दाखल होणार आहे. सोमवारपासून रुळांवरील भाग पाडण्यास आरंभ होईल. नव्या वर्षात, अर्थात जानेवारी २०२६ अखेर पुलाचे पाडकाम पूर्ण करण्याचे आणि जानेवारी २०२७पर्यंत डबलडेकर पूल उभारण्याचे नियोजन महारेलने केले आहे. यासाठी १३२ मीटर लांबीचा ओपन वेब गर्डर उभारण्यात येणार आहे. नव्या डबलडेकर पुलासाठी १६७.३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

डबलडेकर पुलाखालील भागात चार मार्गिका आणि पदपथ असणार आहेत. याचा वापर सध्या धावत असलेल्या वाहनांसाठी व पादचाऱ्यांसाठी करण्यात येईल. त्यावरील मार्गिका पूर्व मुक्त मार्ग, अटल सेतू, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांसाठी असणार आहेत. हा पूल शिवडी-वरळी कनेक्टरचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

मूळ एल्फिन्स्टन पुलाची उभारणी १९१३ मध्ये ब्रिटिशांनी केली होती. लोखंडी आणि स्टीलच्या गर्डरच्या पद्धतीने उभारलेल्या या पुलासाठी बेसाल्ट खडकाचा वापर करण्यात आला होता. आयआयटी मुंबई आणि रेल्वे प्रशासनाच्या संयुक्त संरचनात्मक तपासणीत पूल धोकादायक ठरवण्यात आला होता. एमएमआरडीए आणि मुंबई महापालिका यांच्या देखरेखीखाली शहरातील ब्रिटिशकालीन रेल्वे उड्डाणपुलांचे पाडकाम आणि नव्या पुलांची उभारणी महारेलकडून करण्यात येत आहे. सद्यस्थितीत दादर टिळक पूल आणि भायखळा रेल्वे पुलाच्या उभारणीचे काम महारेलकडून सुरू आहे.

ओपन वेब गर्डरचा वापर

कमी वजन आणि मजबुती यासाठी पुलावर ओपन वेब गर्डर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे, डबलडेकर पुलाखालून रेल्वे वाहतूक होणार असल्याने सुरक्षेची अधिक काळजी घेण्यात येत आहे. ओपन वेब गर्डरची देखभाल-दुरुस्ती अन्य गर्डरच्या तुलनेत सोपी असते. पुलाचे पाडकाम झाल्यावर मोकळ्या जागेत सर्वप्रथम गर्डरची जोडणी करण्यात येईल. त्यानंतर पूल उभारण्याच्या जागेवर तो ठेवण्यात येईल आणि त्यानंतर हा गर्डर रोज काही मीटर ढकलून रेल्वे रुळांवर उभारण्यात येणार आहे.

रविवार, २ नोव्हेंबर २०२५

संवाद

देशाच्या राजकारणातील बिहारी वळण

साऱ्या देशाचे लक्ष लागून राहिलेली बिहार विधानसभेची निवडणूक येत्या ६ आणि ११ नोव्हेंबरला होत आहे. अटीतटीच्या लढतीचे चित्र बिहारमध्ये दिसत असून ही निवडणूक देशाच्या राजकारणाला निर्णायक वळण देईल, असे दिसते.

- सुरेश भटेवरा

तेलाची निसरडी वाट

अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर घातलेल्या नवीन निर्बंधांमुळे भारतीय तेल कंपन्यांसमोर अचानक मोठी अडचण उभी राहिली आहे. भारताची तेलआयात कुठल्या देशातून होणार हे अमेरिका ठरवत असल्याने ही वाट आपल्यासाठी निसरडी झाली आहे.

- राजेंद्र जाधव

मराठी कवितेतली राजमुद्रा

जन्मशताब्दी वर्षात नारायण गंगाराम सुर्वे हे फुरसे नाव नाही तर मराठी कवितेत एक नाममुद्रा झालीय. वास्तविक, सुर्वे हे शंभर वर्षांपूर्वी जन्मलेले कवी न वाटता आजही आजूबाजूला वावरत असलेले समकालीन कवी वाटतात.

- राजीव जोशी

सोबत, 'या वळणावर' मध्ये डॉ. मोहन आगाशे

दीड दशकी, देशभान, भारतभ्रमण ही वाचकीय सदरे.

मुंबईत रक्ततुटवडा?

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मागील दोन महिन्यांत शिबिरांच्या आयोजनामध्ये घट

प्रतिकात्मक छायाचित्र

- मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांतील रक्तपेढ्यांमध्ये १,१०१ पिशव्या शिल्लक
- दिवाळीच्या सुट्टीमुळे रक्तदाते बाहेरगावी
- रक्तदान शिबिरांच्या आयोजनाच्या रक्त संक्रमण परिषदेच्या सूचना

गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत मुंबईतील रक्तपेढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रक्तसंकलन करण्यात आले. यामुळे पुरेसा रक्तसाठा उपलब्ध झाला असताना, तरी मागील दोन महिन्यांमध्ये रक्तदान शिबिरांच्या आयोजनामध्ये घट झाली. त्यामुळे येत्या काळात मुंबईत रक्ताचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे.

मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांतील रक्तपेढ्यांमध्ये सध्यस्थितीत एक हजार १०१ पिशव्या रक्त शिल्लक आहे. त्यामुळे राज्य रक्त संक्रमण परिषदेने मुंबईतील सर्व रक्तपेढ्यांना रेल्वे स्थानके व गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सामान्यतः ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या महिन्यांत दिवाळीनिमित्त शाळा व महाविद्यालयांना सुट्टी असल्याने, अनेक रक्तदाते हे बाहेरगावी जातात. त्यामुळे रक्तदात्यांची संख्या कमी झालेली असते. त्यातच गणपतीच्या कालावधीत विविध राजकीय पक्षांकडूनही मोठ्या संख्येने आयोजित रक्तदान शिबिरांमुळे रक्तदान केलेल्या दात्यांना लगेचच रक्तदान करता येत नसल्यामुळेही सध्या रक्तसंकलन कमी झाले आहे. या पार्श्वभूमीवर, रुग्णांना तुटवडा लक्षात घेता उपलब्ध रक्तसाठ्याचा आढावा घेऊन रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर्व रक्तपेढ्यांना दिले आहेत. विविध संस्था-संघटनांनी ऐच्छिक रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे. रेल्वे स्थानकांवर रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासंदर्भात सोसायट्यांमध्ये रक्तसंकलन करावे, अशा सूचना राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ. पुरुषोत्तम पुरी यांनी दिल्या आहेत.

रुग्णालयानुसार रक्ताची उपलब्धता	पिशव्या
केईएम रुग्णालय	१९३
शीव रुग्णालय	१४९
नायर रुग्णालय	१०५
राजावाडी रुग्णालय	१२
कांदिवली शताब्दी	६
बाबू भगवा रुग्णालय	३
जे.जे. रुग्णालय	७४
जे.जे. महानगर	१९
सेंट जॉर्जेस रुग्णालय	१७
कामा रुग्णालय	३
जी.टी. रुग्णालय	३
टाटा रुग्णालय	५१७

७० वर्षीय नराधमाचा बालिकेवर अत्याचार

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

आरोपीला साथ देणारी जन्मदात्री आईही गजाआड

लंडनहून आलेल्या ७० वर्षीय वृद्धाने १० वर्षांच्या बालिकेवर दोन वर्षांपासून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आणि या मुलीची जन्मदात्री आईच यासाठी नराधमाला मदत करत असल्याचा धक्कादायक प्रकार पनवेल-तळोजा परिसरात उघडकीस आला आहे. पैशांच्या लालसेपोटी हा प्रकार घडल्याचे नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला तपासात आढळले. पोलिसांनी आरोपीसह पीडितेच्या आईलाही अटक केली आहे.

या प्रकरणात अटक केलेल्या वृद्धाचे नाव फारूक अल्लाउद्दीन शेख असून मूळचा पुदुचेरी येथील शेख सध्या लंडनमध्ये कुटुंबासह राहतो. आरोपी तळोजा सेक्टर-२० मधील सदनिकेत दोन-तीन महिन्यांतून एकदा लंडनहून येत होता. बरकमाच्या निमित्ताने पीडितेच्या आईसोबत त्याची ओळख झाली होती. ती आपल्या दहा वर्षांच्या मुलीला आरोपीच्या घरी घेऊन येत होती. वारंवार येणाऱ्या पैशांच्या बदल्यात आरोपीला मुलीला नग्न पाहून लैंगिक अत्याचार करण्यास परवानगी देत असे. कोणाला सांगितल्यास, जीवे मारण्याची धमकी देत असे. दोन वर्षांपासून हा प्रकार सुरू होता. याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाल्यानंतर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सपोनि योगेश देशमुख, नीलम पवार, सरिता गुडे आदींच्या पथकाने गुरुवारी छापा मारून शेखला ताब्यात घेऊन, मुलीची सुटका केली.

पैसे, ऐशआराम आईनेच विकले!

पोलिसांनी पीडितेच्या आईकडे चौकशी केली असता, त्यांनाही धक्का बसला. पीडितेच्या आईने आरोपीकडून घरभाड्यासाठी अडीच हजार रुपये घेतले होते. दर महिन्याचे पैसे ती त्याच्याकडून मिळवायला. रक्कमेतून ती घरखर्च भागवत असे. याद्वारे शेख आपल्या मुलीला घरासाठी वापरत होती. आरोपीच्या घरी पाठवत होती. पैशांच्या मोहापायी ती हे करत असल्याचे चौकशीत उघड झाले.

पुनर्विकासाबाबत मार्गदर्शन

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सरकारी भूखंडांवर असलेल्या गृहनिर्माण संस्था आणि सर्वसामान्यांना त्यांच्या जमिनीचे हक्क, कायद्यांची सखोल माहिती देण्यासाठी 'साथ-प्रतिसाद' संस्थेच्या वतीने रविवार, २ नोव्हेंबर रोजी गोरेगाव येथे मार्गदर्शन संवाद आयोजित केला आहे. या कार्यक्रमात कायदेतज्ज्ञ विश्वास उटगी हे प्रमुख वक्ते असतील. हा कार्यक्रम गोरेगाव पूर्वेकडील नागरी निवारा परिषदेकडील मृणालताई गोरे स्मृती उद्यानातील मृणाल कट्टा येथे सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे.

मार्गदर्शन संवादात नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत अटी-शर्ती, कायदेशीर तरतुदींवर मार्गदर्शन करण्यात येईल. भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरण, 'ब' वर्गातील जमिनी 'अ' वर्गात रूपांतरण नियम, शासकीय भूखंडांसंदर्भातील कायदे, भाडेपट्टा करारांचे नियम आदींवर सभासदांचे हक्क, संस्थेचे मालकी हक्क, मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया, सदस्यांचे कायदेशीर अधिकार, राज्यशासनाने दिलेल्या सवलती याबाबत माहिती देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

बेस्ट बसमार्गात आजपासून बदल

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

काही मार्गांचा विस्तार, तर काही मार्गांवर एसी बस

बेस्ट उपक्रमाने काही बसमार्गांत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये बसमार्गांचा विस्तार करतानाच, काही मार्गांवर एसी बस चालवण्याचे येणार आहेत. याची अंमलबजावणी १ नोव्हेंबरपासून केली जाणार आहे.

यंदाचे आगारातून सुटणारी ए-७५ आणि मुंबई सेंट्रल आगारातून सुटणारी ए-७९ या दोन्ही मार्गांवरील बस आता एमएमआरडीए वसाहत, माहुल रोड, माहुल गाव येथून धावतील. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक ते शिवडी बसस्थानक दरम्यान धावणारी बस क्रमांक ६९ आता वडाळा आगारपर्यंत विस्तारित करण्यात येणार आहे. बसमार्ग ६ मर्यादित आता वाळकेश्वर ते ६ होणार असून हा बस टाटा पॉवर केंद्र ते कुलाबा आगारापर्यंत धावणार आहे. पैसाळेनगर मुलुंड ते मरोळ आगारापर्यंत धावणारी ३०७ क्रमांकाची बस आता ए ३०७ या क्रमांकाने होली स्पिरिट रुग्णालयामार्गे मजास आगारापर्यंत विस्तारित करण्यात आल्याची माहिती बेस्ट उपक्रमाने दिली. घाटकोपर आगार ते आगरकर चौक अंधेरी पूर्वदरम्यान धावणारी ए ५३३ क्रमांकाची बस मोखले यूनामार्ग अंधेरी स्थानक पश्चिम विस्तारित केली जाणार आहे. देवनार आगार ते कोरिवली स्थानक पूर्वदरम्यान धावणारी एसी बस क्रमांक ६० आता ए-३०८ या नव्या क्रमांकाने धावेल. याशिवाय अन्य काही बसमार्गांतही बदल करण्यात आले आहेत. बस मार्ग क्र.ए २०० मालवणी आगार ते दहिसर बसस्थानक, बस क्र. ए २६५ बांद्रे रेक्लेमेशन बस स्थानक ते टाटा वसाहत, ए ३९९ ट्रॉम्बे ते मुलुंड भक्तागाळा प्रताप चौक, ए ४१० विक्रोळी आगार ते महाकाली गुंफा, बस क्रमांक ए ६०४ कांजुरमार्ग बस स्थानक पश्चिम ते भांडुप पश्चिम, ए ६०५ भांडुप स्थानक पश्चिम ते टेंभीपाडा नाका, ए ६०६ भांडुप स्थानक पश्चिम ते अशोक केदारे चौक या बसमार्गांवर सातत्याने बस धावत होत्या. त्याऐवजी एसी बस धावणार असल्याची माहिती बेस्ट उपक्रमाने दिली.

गिरणी कामगार शिंदे यांची भेट घेणार

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

सुधारित शासन निर्णयासाठी पाठपुरावा

गिरणी कामगारांना मुंबईत घरे दिली जातील, तसेच शेलू, वांगणीतील घर न स्वीकारल्यास घराचा हक्क हिरावून घेणाऱ्या १५ मार्चच्या शासननिर्णयातील कलम रद्द करून सुधारित निर्णय काढला जाईल, या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी गिरणी कामगार संघटना आक्रमक झाल्या आहेत. या आश्वासनांचे स्मरण करून देण्यासाठी गिरणी कामगार रविवार, ९ नोव्हेंबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी त्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी जाणार आहेत. गिरणी कामगारांच्या संयुक्त लढा समितीच्या शुक्रवारच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर एकत्र आलेल्या १४ कामगार संघटनांच्या संयुक्त लढा समितीच्या बैठकीत या प्रश्नावर चर्चा झाली. गिरणी कामगारांच्या ९ जुलैच्या आंदोलनावेळी गिरणी कामगार लढा समितीचे प्रमुख आमदार सचिन अहिर यांच्यासह कामगार नेत्यांच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन दिले होते. त्याची आठवण करून देण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांना भेटण्याचा निर्णय घेण्यात आला.

निवडणूकघोषणा येत्या आठवड्यात

(पान १ वरून)

आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते.

जिल्हा परिषद निवडणुकांची प्रक्रिया सुरू असताना महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ची मुदत दिली आहे. निवडणुकीच्या दरम्यान किंवा नंतर न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका निवडणुका मुदतीपूर्वी १० दिवस आधी पार पाडल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.

१९ ते २३ जानेवारी २०२६दरम्यान दावोस येथे जागतिक आर्थिक परिषद होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या परिषदेला हजर राहणार आहेत. त्यामुळे २० जानेवारीपूर्वी महापालिका निवडणुका होतील, असेही सांगण्यात आले.

मतदान यंत्रासाठी मध्य प्रदेश सरकारशी करार

दरम्यान, राज्यात प्रथमच मोठ्या संख्येने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होत आहेत. या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनचा (ईव्हीएम) तुटवडा भासू नये, यासाठी राज्य निवडणूक आयोगाने मशिन पुरवठ्यासाठी मध्य प्रदेश सरकारशी करार केला आहे. याशिवाय 'इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'कडून ५० हजार ईव्हीएम खरेदी केली आहेत. तरीच भारत निवडणूक आयोगाकडेही 'ईव्हीएम'ची मागणी करण्यात आल्याचे समजते.